International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# लोकशाही मूल्यांची घसरण व भ्रष्टाचाराचे थैमान! ‘द एकॉनॉमिक्स’च्या लक्षवेधी निष्कर्षाची वर्तमानकालीन चिकित्सा

**प्रा. डॉ. प्रदीप रामकृष्ण राऊत**

गिलानी महाविद्यालय, घाटंजी ए जि. यवतमाळ

लोकशाही ही निश्चितच एक आदर्श राजकीय व्यवस्था आहे. मात्र आज लोकशाही मूल्यांची मोठ्या प्रमाणात घसरण होताना दिसून येते. प्रामुख्याने वाढता भ्रष्टाचार या मूल्यघसरणीमागील प्रमुख कारण सांगितले जाते. ...प्रस्तुत शोधनिबंधात अनेक संदर्भाचा विचार करून, नेमके या विषयाचीच वर्तमानकालीन चिकित्सा केलेली असून अंती जागतिक व स्थानिक पातळीवरील काही महत्वपूर्ण निष्कर्ष नोंदवलेले आहेत. भ्रष्ट मनोवृत्तीला जोपासून, लोकशाहीला तडे देवू पाहणाऱ्या नकारात्मक नवविचारांना हा शोधनिबंध नक्कीच छेद देईल असा विश्वास वाटतो. अमेरिकेचे माजी अध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी केलेली लोकशाहीची व्याख्या सर्वविदीतच आहे. ‘लोकांनी लोकांकडून लोकांसाठी राबवलेली व्यवस्था म्हणजे लोकशाही’ अशा त्यांच्या व्याख्येचा आशय आहे. पण आधुनिक काळाचा विचार करता, ही व्याख्याच संपूर्णत: बदलताना दिसते, ज्यामुळे केवळ भारतालाच नव्हे तर संपूर्ण जगालाच संपवू पाहणारा हा प्रवाह तत्काल बदलवण्याची गरज भासू लागली आहे.

**<u>लोकशाही मूल्यांच्या घसरणीची समीक्षा—</u>**

अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक विजेते व जागतिक दर्जाचे राजकीय विचारवंत श्री जोसेफ स्टिग्लीट्झ यांनी वर्तमान लोकशाहीची व्याख्या करताना स्पष्ट केले की, ‘१ टक्का लोकांचे, १ टक्का लोकांकडून, १ टक्का लोकांसाठी चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही राज्य होय.’ अर्थातच, ही १ टक्का माणसे म्हणजे नेमके कोणती माणसे? असा गर्भित व गंभीर प्रश्न यातून जगापुढे निर्माण होतो. मात्र हा १ टक्का लोकसमुह म्हणजे केवळ धनदांडग्यांचा समूह असल्याचेच सूचन या व्याख्येतून होताना दिसून येते. म्हणूनच वर्तमानकालीन भारताचा विचार करता, सन २०१८ मध्ये मा. राज्य निवडणूक आयोगाने खास करून मुंबई येथे एक कार्यशाळा आयोजित करून, धन, बाहुबलता व प्रसारमाध्यमे यांचा गैरवापर कसा थांबवता वा कमी करता येईल, यावर घनघोर विचारमंथन केले. या विचारमंथनातून, ‘जोपर्यंत संपूर्ण लोकशाहीला भांडवलशाहीच्या विळख्यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न होत नाही तोपर्यंत निवडणुकांमध्ये धनसंपत्तीचा गैरवापर कमी करण्याचे प्रयत्न म्हणजे सूर्याला दिवा दाखवण्यासारखे आहे’ हे स्पष्ट करून, ‘अशा परिस्थितीत निवडणूक आयोगाने त्रयस्थ व स्वायत्त संस्था म्हणून देशाला नवी दिशा द्यावी’ असे सूचित केले आहे. भारतातील लोकशाही मूल्यांच्या घसरणीकरिता कारणीभूत ठरणाऱ्या भ्रष्टाचाराबाबत, तर सर्वांनी गंभीरपणे विचार करण्याची वेळ आलेली आहे. निवडणुकीदरम्यान केलेला अमाप खर्च हीच बाब भ्रष्टाचाराची खरी जननी ठरते. ...मात्र आज आपल्या देशातील सर्वच राज्यांचे निवडणूक आयोग मुठभरांच्या हातातील कळसुत्री बाहुल्या झालेल्या आहेत. खास करून या भ्रष्टतेमुळेच मोठ्या प्रमाणात भारतात लोकशाही मूल्यांची घसरण झालेली आहे.

लोकशाहीची अशी होणारी घसरण व त्याचे सुयोग्य मूल्यमापन करणास्तव आज जगभरात अनेक संस्था कार्यरत आहेत. प्रामुख्याने डेम इन्स्टिट्यूटने जागतिक पातळीवर सर्वत्र लोकशाही मूल्यांची अधोगती होत असल्याचे अभ्यासपूर्ण निष्कर्ष नोंदवलेले आहेत. विशेष म्हणजे लंडनमधील ‘द एकॉनॉमिस्ट’ने तर अगदी अलिकडे म्हणजे सन २०२१ मध्ये, लोकशाहीची होणारी घसरण पाहून अनेक गंभीर ठरणारे निष्कर्ष नोंदवलेले आहेत. त्यांच्या इंटेलिजन्स ब्युरोने जगातील १०० टक्के नागरिक नजरेपुढे ठेवून तब्बल २००६ पासून दरवर्षी जगभरात होणारे लोकशाही मूल्यांचे हनन पडताळून लोकशाहीच्या सुदृढतेचा जणू निर्देशांक मांडला आहे तो असा—

१. पूर्णपणे लोकशाही व्यवस्थेत असणारे लोक: ०६.०४ टक्के
२. दोषपूर्ण लोकशाही व्यवस्थेत असणारे लोक: ३९.०३ टक्के
३. मिश्र लोकशाही व्यवस्थेत असणारे लोक: १७.०२ टक्के
४. हुकुमशाही व्यवस्थेत असणारे लोक: ३७.०१ टक्के

एवढेच नाही तर ‘द एकॉनॉमिस्ट’ने खास करून भारतासंदर्भात खालील निष्कर्ष नोंदवलेले आहेत.
१. ‘भारत हा देश दोषपूर्ण लोकशाहीत असणारा देश आहे.’
२. ‘भारतातील लोकशाही उत्तरोत्तर क्षीण होवू लागली आहे.’
या अशा गंभीर निष्कर्षांमधूनच प्रत्येक अभ्यासू नागरिकांना व शासन यंत्रणांना खऱ्या वास्तवाची जाणीव होवू शकते.

**<u>भ्रष्टाचाराचे थैमान—</u>**

भारतातील लोकशाही मूल्यांच्या घसरणीकरिता कारणीभूत ठरणाऱ्या भ्रष्टाचाराबाबत, न्यायव्यवस्थेच्या सर्वोच्च स्थानी असणारे राष्ट्रपती, पंतप्रधान, अधिकारी व विचारवंत काय म्हणतात, याचाही गंभीरपणे विचार करण्याची वेळ आलेली आहे. कारण, त्यांच्या विधानांमधून इथल्या भ्रष्टाचाराची नेमकी तिव्रता कळते. विशेष म्हणजे, सरकारमधील भ्रष्टाचार उघडकीस आणणाऱ्यांना भयमुक्त केले जाणार असून त्यांना संरक्षण देणाऱ्या ‘व्हिसल ब्लोअर विधेयक २०११’ ला राष्ट्रपतींनी मंजुरी दिली आहे.

१. राष्ट्रपती प्रणव मुखर्जी आपल्या दि. ९ जून २०१४ च्या अभिभाषणात म्हणतात, ‘वाढत्या भ्रष्टाचारामुळे देशाचा विकास खुंटलेला आहे. प्रत्येकाने भ्रष्टाचार रोखण्यास प्राधान्य द्यावे’
२. राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दूल कलाम म्हणतात, ‘आपला देश भ्रष्टाचार मुक्त म्हणून पुढे येवू शकेल. मात्र त्यासाठी शिक्षकांना महत्वाची भूमिका बजावावी लागेल.’
३. राष्ट्रपती रामनाथ कोविंद म्हणतात, ‘नागरिकच प्रजासत्ताकाचे भाग्यविधाते आहेत. त्यांना भ्रष्टाचार निर्मूलनार्थ अहिंसक मार्गाने संघर्ष करावा.’
४. मा. न्यायालयांनी सुद्धा भ्रष्टाचाराबाबत चिंता व्यक्त केली आहे. ‘भ्रष्टाचारास पायबंद न घातल्यास समाज मृतवत होईल.’ असे मत दिल्लीच्या न्यायालयाने व्यक्त केले तर ‘शिक्षण हा मोठ्या प्रमाणात व्यापार झाला आहे.’ ‘जनतेच्या पैशाचा अपव्यय करणाऱ्या अधिकाऱ्यांची संपत्ती जप्त करा.’ अशी मते मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने व्यक्त केली आहे.

५. राज्याचे माजी मुख्यमंत्री मा. पृथ्वीराज चव्हाण शासन पत्रक २२ मे २०१२ मध्ये म्हणतात, 'भ्रष्टाचार निर्मुलनाकरिता पारदर्शक प्रशासनाची गरज आहे.'

६. सामाजिक कार्यकर्ते गिरीश जाखोटिया म्हणतात, 'जोपर्यंत भ्रष्टाचार लढ्यातील लोकसहभाग सुनिश्चित होत नाही, तोपर्यंत आमची भ्रष्टाचाराच्या फेऱ्यातून कधीच सुटका होणार नाही.' 'भारत कठीण परिस्थितीतून वाटचाल करीत आहे. पण आता वाढत्या भ्रष्टाचारामुळे परिस्थिती अधिकच कठीण बनली आहे.' तर निवृत्त सनदी अधिकारी आभासिंग म्हणतात, 'भ्रष्टाचाराविरूद्ध आवाज उठवायलाच हवा.'

पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी तर ०१ **जानेवारी** २०२३ च्या 'मन की बात'मध्ये स्पष्ट सांगतात, 'आता राजकारण म्हणजे पैशाची सत्ता आणि घोडेबाजार झाला आहे. आमदारांना विकत घेणे हा राजकारणाचा मुख्य मंत्र बनला आहे. लोकांना घाबरवण्यासाठी व अनीतिने राजकारण करणाऱ्या चाणक्यांचा महापूर आला आहे.' ... एवढेच नाही तर आयडॉलॉजी अर्थात विचारधारा संपल्याची स्पष्ट कबुली देवून त्यांनी सांगितले की, 'आज २० कोटी लोक दारिद्रेषेखाली आहेत. २३ कोटी लोक दररोज १६३ रूपयांपेक्षा कमी कमावत आहेत. ३३ लाख ३४ हजार बालके कुपोषित आहेत. ४ कोटी शिक्षित लोक बेरोजगार आहेत.' ...देशातील विषमतेवर बोलताना ते सांगतात, '१ टक्का लोकांच्या हाती देशाचे २० टक्के तर ५० टक्के लोकांच्या हाती केवळ १३ टक्के इनकम आहे. देशाची मोठी लोकसंख्या शुद्ध पेयजल आणि पोषक अन्नापासून वंचित आहे. ८१ कोटी लोकांना मोफत धान्य द्यावे लागत आहे.' ...पंतप्रधानाच्या या विधानांमधून देशात होत असेलेले लोकशाहीचे मूल्यांची घसरण व भ्रष्टाचाराचे वाढते थैमान कुणाच्याही लक्षात येते.

भ्रष्टाचाराविरूद्ध संपूर्ण जगातील नागरिकांना जागृतीचा संदेश देण्यासाठीच १९७३ पासून मा. संयुक्त राष्ट्रसंघाने ९ डिसेंबर हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोध दिन' म्हणून साजरा करावा असे आवाहन केले आहे. आपल्या एका अहवालातून युनोने स्पष्ट केले की, जगातील दर ६ नागरिकांमध्ये १ नागरिक भ्रष्टाचाराचा बळी ठरलेला आहे. यासाठीच युनोने, "UNITED AGAINST CORRUPTAION FOR DEVELOPMENT, PEACE AND SECURITY." असे आवाहन केले आहे. नागरिकांप्रती शासन यंत्रणेतील अधिकारी पदाधिकारी यांची भूमिका कशी असावी? याबाबत महात्मा गांधीजींनीही आपली भूमिका विषद केली आहे. ते म्हणतात, ''आपल्याकडे येणारे नागरिक हे फार मोलाचे आहेत. ते आपल्यासाठी नसून आपणच त्यांच्यासाठी असल्याने, ते आपल्या कामात व्यत्तय नाही तर आपल्याच कामाचा गाभा आहेत! त्यांना सेवा पुरवून आपण त्यांचेवर उपकार करीत नाहीत तर सेवा करण्याची संधी देवून तेच आपणास उपकृत करतात!''

संयुक्त राष्ट्रसंघ व सर्वोच्य न्यायालयाची पुढील मते लक्षात घेता, भारतातील शासन यंत्रणा प्रामाणिकपणे कार्य करीत आहे का याबद्दल शंका उपस्थित होते. संयुक्त राष्ट्रसंघ म्हणते,_''नागरिकांचे माहिती मिळविण्याचे स्वातंत्र्य हा मूलभूत मानवाधिकार असून तो संयुक्त राष्ट्रांनी मान्यता दिलेल्या नागरिकांच्या स्वातंत्र्याची आधारशीला आहे. प्रत्येकाला स्वत:चे मत बनवण्याचे स्वातंत्र्य आहे. यात माहिती मागणे, माहिती घेणे, माहिती देणे व माहितीचे आदान प्रदान करणे अभिप्रेत आहे. माहितीचा अधिकार हा मूलभूत मानवाधिकार आहे.'' ...मा. सर्वोच्य न्यायालयाचे न्यायमूर्तीही सांगतात, ''जबाबदारीच्या शासनामध्ये नागरिकांना सर्व व्यवहारांचे तपशील जाणून घेण्याचा अधिकार आहे. शासन यंत्रणा नागरिकांना उत्तरदायी असल्या पाहिजेत हाच खुल्या व पारदर्शी शासनाचा पाठ आहे.'' (न्यायमूर्ती मॅथ्यू) ''नागरिक माहिती मिळविण्यासाठी आपला अधिकार कोठेही व केव्हाही वापरू शकतो. शासन आणि प्रशासन पारदर्शी करण्यासाठी शासनामध्ये नागरिकांचा सहभाग वाढला पाहिजे.'' (न्यायमूर्ती कृष्णा अयर) ...एकंदरीत, मा. सर्वोच्य न्यायालयाच्या मते, नागरिकांना सरकारला प्रश्न विचारण्याचा, सरकारच्या धोरणावर आक्षेप घेण्याचा, सरकारच्या मतांशी असहमत होण्याचा, सरकार हे सामाजिक, आर्थिक, कल्याणकारी जबाबदाऱ्यांसह घटनात्मक कर्तव्ये बजावत आहे की नाही हे तपासण्याचा, सरकारच्या कामाची शहनिशा करण्याचा, मूलभूत अधिकार आहे. ...मात्र यंत्रणांकडून नागरिकांना अपेक्षित प्रतिसाद नसल्याने, प्रत्यक्षात वेगळी स्थिती दिसून येते.

लोकशाही म्हणजे एकप्रकारचा सामाजिक न्याय होय असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाटायचे. एवढेच नाही तर लोकशाही हे एक महत्त्वपूर्ण असे मूल्य आहे, असेही त्यांचे ठाम मत होते. या देशात हे मूल्य रूजवण्याचे कार्य करून त्यांनी लोकशाहीच्या सुदृढतेसाठी अनेक उपाययोजना सांगितल्या. स्वातंत्र, समता, बंधुतेशिवाय लोकशाहीला अर्थच राहणार नाही, या विचाराचा त्यांनी आपल्या लेखनीच्या व भाषणांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला. सामाजिक न्यायाची स्थिती ही लोकशाहीतच अस्तित्वात राहू शकते, या देशाने निखळ लोकशाहीचे तत्व स्वीकारले तरच हा समाज निर्धोकपणे पुढे जाईल. हा विचारही त्यांनीच ठोसपणे मांडला आहे. ...अर्थातच, आपल्या देशातील विद्यमान लोकशाहीची घसरण व भ्रष्टाचाराचे थैमान थांबवायचे असेल तर हा विचार स्वीकारूनच प्रत्येकाला पुढे जावे लागेल.

**निष्कर्ष–**

१. 'द एकॉनॉमिस्ट'ने सन २०२१ मध्ये, भारतातील लोकशाहीची होणारी घसरण पाहून अनेक गंभीर निष्कर्ष नोंदवलेले आहेत. भारतातील वाढता भ्रष्टाचार हेच यामागील प्रमुख कारण असून शासन यंत्रणांनी व नागरिकांनी आज सजगतेची भूमिका स्वीकारण्याची कधी नव्हे ती वेळ आलेली आहे. अन्यथा आपली लोकशाही अधिकच क्षीण होईल.

**संदर्भ–**


१. कायदा माहितीचा अन् अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा, प्रल्हाद कचरे/शेखर गायकवाड, प्रकाशक–य.च.विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे. आवृत्ती ९ वी, जुलै २०१४

२. दै. लोकसत्ता– ८.१.२०२३

३. राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांचे दि. ९ जून २०१४ चे अभिभाषण.

४. शासन पत्रक– २२ मे २०१२

५. दै. लोकमत– १५.३.२०१२ व ५.४.२०१२

६. दै. लोकसत्ता– २४.८.२०१३

7- दै. लोकसूत्र– १.१.२०२३